# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १४२-२२** **दिनांक :- २०/०५/२०२२**

## बतावणी करुन सोन्याचे दागिने लंपास करणा-या टोळीला अटक करुन त्यांचेकडुन रु. ४,१०,५००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस ठाण्यास यश.

दिनांक २५/०४/२०२२ रोजी ११.३० वा. सुमासास फिर्यादी नामे श्रीमती शायना नखवी, वय ५१ वर्षे रा. फिश मार्केट जवळ, पुष्पा बॅगल्स, नगरपालिका ऑफिस, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर या बेसीन कॅथलीक बँक समोरील गार्डन विरार पुर्व येथे मार्केटमध्ये भाजी खरेदी करण्याकरिता गेल्या असता तेथे अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचेशी गोड बोलुन त्यांचे गळयातील मंगळसुत्र, सोन्याची चैन, कर्णफुले व अंगठी काढण्यास सांगुन ते रुमालात गुंडाळून ठेवत असल्याचे भासवुन हातचलाखीने फिर्यादीचे सोन्याचे दागिने फसवणुक करुन नेले होते. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४२७/२०२२ भा.द.वि.स. कलम ४२०, ३४ दिनांक २५/०४/२०२२ रोजी १७.२२ वा. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सदर गुन्हयाचा तपास करत असतांना गुन्हे शाखा वसई युनिट-२ यांनी तुळींज पोलीस ठाणे कडील गु.र.क्र. २२२/२०२२ भादंविस कलम ४२०, ३४ मधील आरोपीत नामे १) संजय राजूभाई सलाड वय-२० वर्षे, २) भिमागाई शांतीलाल राठोड वय ४० वर्षे, ३) अर्जुन शांतीलाल राठोड वय ४० वर्षे सर्व रा. कुबेरनगर, अहमदाबाद गुजरात यांना अटक केले होते. सदर गुन्ह्यातील आरोपीतांना वर नमुद विरार पोलीस ठाणेकडील गुन्हयामध्ये तपासकामी आरोपीतांचा ताबा घेवुन सखोल चौकशी केली असता सदर आरोपीतांचा विरार पोलीस ठाण्याकडील दाखल गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न झाला.

पोलीस कोठडी दरम्यान सदर आरोपीत यांनी विरार व तुळींज पोलीस ठाण्याचे खालील प्रमाणे ५ गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे. पोलीस कोठडी दरम्यान सदर आरोपीत यांना विश्वासात घेवुन विचारपुस करता त्यांनी खालील पाचही गुन्हयातील फसवणुक केलेला माल पालनपुर, जिल्हा बनासकंठा गुजरात येथे गहाण ठेवल्याची कबुली दिली. त्यानुसार तपासी अधिकारी सपोउनि/सुरेंद्र शिवदे, पोलीस अंमलदार/दिपक जगदाळे, चेतन निंबाळकर यांच्या पथकाने आरोपी नामे अर्जुन राठोड याचेसह खाजगी वाहनाने पालनपुर, गुजरात येथे रवाना झाले व वरिल पाचही गुन्हयातील सुमारे रु. ४,१०,५००/- सोन्याचे दागिने असा १०० % चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं. |
|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | ४२७/२०२२ भादविस कलम ४२०, ३४. |
| २. | विरार पोलीस ठाणे | ३५३/२०२२ भादविस कलम ४२०, ३४. |
| ३. | विरार पोलीस ठाणे | २१४/२०२२ भादविस कलम ४२०, ३४. |

| | | |
|---|---|---|
| ४. | विरार पोलीस ठाणे | ३७६/२०२२ भादविस कलम ४२०, ३४. |
| ५. | तुळींज पोलीस ठाणे | २०७/२०२२ भादविस कलम ४२०, ३४. |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. सुभाषचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, सपोउपनि/सुरेंद्र शिवदे, पो.अंम/दिपक जगदाळे, चेतन निंबाळकर यांच्या पथकाने केलेली आहे.

-------------ooooooo--------------